
G61/BPS304/EE/20160530

वेळ : 3 तास **गुण : 80**

विद्यार्थ्यांसाठी सूचना :

1. विभाग A वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा आहे. त्याची उत्तरे उत्तरपत्रिका / OMR Sheet वर नोंदवायची आहेत.

2. OMR Sheet वरील चार पर्यायांपैकी अचूक पर्यायाखालील वर्तुळ काळ्या पेनाने पूर्ण भरावे. वर्तुळ अर्धवट भरल्यास अथवा एका प्रश्नास जास्त वर्तुळ भरल्यास ते उत्तर चुकीचे समजले जाईल.



A B C D

उत्तराची अयोग्य नोंद



A B C D

उत्तराची योग्य नोंद

3. बहुपर्यायी प्रश्नांमध्ये सर्वात अचूक उत्तरे नोंदविणे अपेक्षित आहे.

4. विभाग B वस्तुनिष्ठ विनापर्यायी स्वरूपाचा आहे. त्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिली आहे.

5. विभाग C हा दीर्घोत्तरी स्वरूपाचा असून आवश्यक तेथे नकाशा व आकृत्या काढणे अपेक्षित आहे.

6. विभाग A साठी प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 1/3 उणे गुणपद्धत लागू आहे.

7. विभाग B आणि विभाग C साठी उणे गुणपद्धत लागू नाही.

SECTION - A (गुण : 24)

या विभागात एकूण 48 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला अर्धा गुण याप्रमाणे हा विभाग 24 गुणांचा आहे. या विभागाला 1/3 उणे गुणपद्धत लागू आहे.

1. तुम्ही कपड्याचे दुकान टाकले आहे. काही स्थानिक गुंडांनी तुमच्याकडे हप्त्याची मागणी केली. त्यांनी हे सुद्धा सांगितले की त्या परिसरात सर्वच हे पैसे देतात. तुम्ही काय कराल ?
   a) पोलीसात तक्रार कराल
   b) इतर व्यावसायिकांशी संपर्क करून संयुक्त लढा देण्याची उपाययोजना कराल.
   c) सुरक्षा एजन्सीचे गार्ड स्वतःच्या सुरक्षेसाठी मागवाल.
   d) हप्ता द्याल आणि आपले काम कराल.

2. तुमच्या सहकाऱ्याचा अपघात झाला आहे. आता तुमच्या विभागीय प्रशासकीय अध्यक्षांची इच्छा आहे की, तुम्ही सध्या करत असलेल्या कामाबरोबरच तो करत होता त्या कामाची जबाबदारी घ्या. तुमच्यावर कामाचा खूप ताण पडणार आहे. काय कराल ?
   a) स्वीकार कराल
   b) सध्याच्या कामांचे कारण देऊन दुसऱ्या सहकाऱ्याचे नाव सुचवाल.
   c) नकार द्याल कारण आताचा कारभार खूप आहे.
   d) अतिरिक्त कर्मचारी मिळण्याच्या अटीवर स्वीकार कराल. परंतु तुम्हाला हे माहीत आहे की विभागात कर्मचाऱ्यांची कमतरता आहे आणि कर्मचारी मिळणार नाहीत.

3. तुम्ही सिनेमा बघायला गेला आहात. तिकीट विकणारी व्यक्ती तुमच्याकडे दुप्पट किंमत मागते, कारण तिकिटे उरलेली नाहीत. काय कराल ?
   a) सिनेमा प्रशासनाकडे तक्रार करण्याची धमकी द्याल.
   b) सिनेमा न बघता परत जाल.
   c) दुप्पट किंमतीला तिकिटे विकत घ्याल.
   d) सिनेमा प्रशासनाकडे तक्रार कराल.

4. तुमच्या मालकाने तुमची चूक नसताना तुमचा अपमान केला तर तुम्ही -
   a) काम सोडून द्याल.
   b) तुमची चूक नाही हे पटवून द्याल
   c) चिडून त्याचा अपमान कराल.
   d) वरीलपैकी नाही

5. तुम्ही मॅनेजर आहात. त्या कंपनीतील कर्मचारी संपावर जाताना तुम्ही काय कराल?
   a) त्यांच्या समस्या समजून घ्याल आणि सोडवण्याचा प्रयत्न कराल.
   b) काहीही करणार नाही.
   c) दुसरे पर्याय शोधाल.
   d) वरीलपैकी नाही.

6. तुम्ही एका भूकंपग्रस्त भागात आरोग्यसेवा देत आहात. तुम्ही प्रामाणिकपणे काम करूनसुद्धा तुमच्याविरूद्ध पैसे खाण्याचे आरोप केले जातात. तुम्ही -
   a) त्याबाबत चौकशी होऊ द्याल
   b) तुमच्या वरिष्ठांकडे दुसऱ्या व्यक्तिची नियुक्ती करण्याची मागणी कराल.
   c) लक्षच देणार नाही.
   d) काम बंद ठेवाल.

7. तुमच्या मित्राचा जीव वाचविण्यासाठी तुम्ही वेगाने गाडीवर जात आहात. सिग्नल लागतो. पण तोडल्यावर तुम्हाला लवकर पोहोचता येईल. काय कराल?
   a) सिग्नल तोडाल.
   b) सिग्नल सुटण्याची वाट बघाल.
   c) पोलीसांशी चर्चा करून लवकर निघण्याचा प्रयत्न कराल.
   d) कोणतेही नाही.

8. पुरक्षेत्रात तुमच्यावर सरकारने बोटी भाड्याने घेण्याची जबाबदारी सोपवली आहे. बोटीच्या मालकाने सांगितलेल्या किंमतीवरून तुमच्या लक्षात आले की, किंमत ही सरकारने सांगितलेल्या किंमतीपेक्षा तिपटीने अधिक आहे. तुम्ही काय कराल ?
   a) नकार द्याल आणि नवीन किंमतीची मागणी कराल.
   b) त्यात सगळ्यांत कमी असेल ती स्वीकाराल.
   c) शासनाकडे त्याची कल्पना द्याल आणि वाट बघाल.
   d) त्या मालकांना त्याचे लायसेन्स रद्द होईल याची धमकी द्याल.

9. तुम्ही मध्यरात्री कारमधून एका शहराकडून दुसऱ्या शहराकडे जाताना तुमची कार बंद पडते. तुम्ही -
   a) कार कंपनीच्या हेल्पलाईनवर फोन करून त्यांची दुरूस्तीसाठी आपल्या परिवारासोबत वाट बघाल
   b) कुटुंब सुखरूप पोहोचावे यासाठी एखादे पर्यायी साधन शोधाल आणि मग हेल्पलाईनवर फोन कराल.
   c) आधी मेकॅनिक शोधाल, मग पर्यायी साधन.
   d) a नंतर b पर्याय

10. तुमच्याकडे एक महत्त्वाची व्यक्ती कामकाज बैठकीला उपस्थित न राहिल्याबद्दल खुलासा मागितला आहे. तुमच्या वरिष्ठाने त्याबाबत तुम्हाला माहितीच दिल नव्हती. आता तुम्ही त्यांच्याकडे बोट दाखवू नये म्हणून ते तुमच्यावर दबाव आणत आहेत. तुम्ही -
    a) खरा खुलासा लिहून पाठवाल.
    b) सर्वांत वरिष्ठ अशा अधिकाऱ्याला भेटाल.
    c) चूक मान्य कराल आणि वेळ मारून न्याल.
    d) बैठकीच्या को-ऑर्डिनेटरवर आरोप कराल.

11. तुम्ही 20 लोकांसोबत गंगा नदी पार करत आहात. तेव्हा नावेमधल्या बाजूला एक भोक पडले, पाणी नावेत यायला सुरूवात होते. तुम्ही -
    a) कापडाच्या तुकड्यांनी ते बंद करण्याचा प्रयत्न कराल.
    b) नावेतील पाणी बाहेर काढाल आणि त्याच वेळेस वेगाने नाव पुढे घ्याल.
    c) संबंधित मदत विभागाला फोन करून त्यांना परिस्थिती सांगाल.
    d) b व c

12. तुम्ही गावात लसीचे वाटप करत आहात. तुमच्याकडे एक लस उरली आहे. तिची गरज सरपंच व एक गरीब व्यक्ती या दोघांना आहे. सरपंच तुमच्यावर दबाव आणत आहे. काय कराल ?
    a) कुणाला न देता नवीन पुरवठ्याची मागणी कराल.
    b) दुसरीकडील विक्रेत्याकडून गरीबासाठी लस मागवून घ्याल.
    c) दोघांना डॉक्टरकडे नेऊन ज्याला जास्त गजर आहे त्याची तपासणी करायला सांगाल.
    d) सरपंचांसाठी दुसरी लस मागवून घ्याल.

13. तुम्हाला पुढील दोन दिवसांत एक अतिशय महत्वाचे काम आहे. अचानक तुमचा अपघात होतो. तुमच्या ऑफिस-मधून आग्रह आहे की काम तुम्हीच पूर्ण केले पाहिजे. तुम्ही -
    a) वेळ वाढवून मागाल.
    b) तुम्ही काम करूच शकत नाही असे कळवाल.
    c) दुसऱ्या व्यक्तीचे नाव सुचवाल
    d) बरे होईपर्यंत यापासून लांब रहाल.

14. स्थानिक गुंडाने तुमच्या जागेवर अनधिकृत बांधकाम चालू केले आहे. तुम्हाला तुमची जागा स्वस्त दरात त्यालाच विकावी लागेल, अशी धमकी त्याने दिली आहे. तुम्ही -
    a) विकू द्याल
    b) पोलीसात तक्रार कराल.
    c) शेजाऱ्यांची मदत मागाल
    d) त्याच्यासोबत चर्चा करून थोडी जास्त किंमत द्याल.

15. तुमच्याकडे एक प्रभावी व्यक्तीची सून आली आहे. तुम्ही प्रशासकीय अधिकारी आहात. हुंडा कमी मिळाल्यामुळे तिचे हाल केले जातात. अशी तिने तक्रार केली आहे. तिचे आई-वडील सामाजिक दबावामुळे तुमच्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. तुम्ही -
    a) त्यांच्या सासऱ्यांकडून खुलासा मागाल.
    b) तिला तडजोड करायला सांगाल.
    c) तिचे आई-वडील आल्यावर काय ते कराल.
    d) तिला पोलीसात तक्रार करायला सांगाल.

16. तुम्ही ट्रेन पकडण्यासाठी स्टेशनवर गेला आहात. बघितले तर तुमची ट्रेन स्टेशन सुटत होती. तिकीट काऊंटर समोरच्या रांगेत उभे राहिले तर ट्रेन नक्की सुटेल. पुढची ट्रेन 3 तासांनंतर आहे. तुम्ही -
    a) तिकिटाशिवाय चढाल आणि पकडल्यास दंड भराल.
    b) रांगेत उभे रहाल व पुढच्या ट्रेनची वाट पहाल.
    c) रांगेत सर्वांत पुढे उभ्या असलेल्या व्यक्तीला आपली समस्या सांगाल व त्याला तुमच्यासाठी तिकीट काढायला सांगाल.
    d) एक प्लॅटफॉर्म तिकीट खरेदी कराल व तिकीट चेकरला भेटून सांगाल की तुम्ही बसत आहात. तुमच्या प्रवासाला वैध बनवण्यासाठी त्याच्याकडून आवश्यक ते कागदपत्र बनवून घ्याल.

17. तुम्ही स्कूटरवरून ऑफिसला जात आहात. तुम्ही बघितले की, दोन मुले बाईकवरून एका वृद्ध महिलेची सोन्याची चेन पळवून नेतात. तुम्ही -
    a) महिलेला भावनात्मक समर्थन द्याल.
    b) चोराचा पाठलाग कराल.
    c) आधी बाईकचा नंबर लिहून घ्याल, मग पोलिसांना नंबर कळवाल.
    d) आधी महिलेकडे जाऊन बघाल की तिला दवाखान्यात नेण्याची गरज तर नाही ना!

18. कॉलेजच्या अभ्यासिकेत बसलेले असताना तुम्हाला अचानक धक्के जाणवायला लागले. सगळे ओरडायला लागतात की, हा भुकंप आहे. तुम्ही काय कराल?
    a) शिक्षकाला वाचवाल.
    b) मदतीसाठी ओरडाल.
    c) शांत राहून धक्क्यांच्या गंभीरतेचे आकलन कराल.
    d) सर्व वर्गमित्रांना आपत्कालीन दारापर्यंत सुरक्षा मानकांचा वापर कराल.

19. तुमचा भाडेकरू भाडे देत नाही. घरावर त्याने कब्जा केला आहे. तुम्ही -
    a) त्याच्यावर दबाव टाकाल.
    b) पोलीसात न्याल.
    c) गुंड पाठवाल.
    d) भाडेकरूंशी बोलून, त्याची समस्या समजून यावर तोडगा काढाल.

20. तुम्ही औषधांच्या गोदामावर छापा घातला, तपासाअंती लक्षात आले की, औषधांची अंतिम तारीख निघून गेली होती. निर्मात्याचा दावा आहे की, तो ही औषधे गरीबांमध्ये वाटणार होता. तुम्ही -
    a) त्यातला खरेपणा तपासाल व सिद्ध झाल्यावर त्याला आपले काम करू द्याल.
    b) विश्वास ठेवाल कारण ती समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती आहे.
    c) कायदेशीर कारवाई कराल.
    d) कंपनीला कुलूप लावून त्याला अटक कराल व कायद्याने आर्थिक दंड भरायला लावाल.

21. तुमच्या कार्यालयातील वस्तुंची चोरी होते आहे. तुम्हाला तुमच्या एका सहकाऱ्यावर संशय आहे. तुम्ही त्याला काही वस्तु ठेवतांना बघितले आहे. तुम्ही -

a) अजून पुरावे गोळा कराल आणि त्याला 'रंगेहाथ' पकडाल.

b) त्याला स्पष्टपणे सांगणे व खुलासा करण्याची संधी द्याल.

c) सुरक्षा कर्मचाऱ्यांना सांगून त्यांच्यावर नजर ठेवाल.

d) काही नाही करणार

22. तुम्ही तुमच्या गाडीतून मित्राबरोबर जात असताना तुमच्या गाडीला भरधाव वेगात एक मोटारसायकल येऊन धडकते. अशा परिस्थितीत तुम्ही काय कराल ?

a) तुम्हाला दुसऱ्या ठिकाणी पोहोचणे आवश्यक असल्याने तिथून निघून जाल

b) मोटार सायकल चालकावर प्राथमिक उपचार करून त्याला दवाखान्यात घेऊन जाल व पोलीसांना फोनवरून घडलेल्या घटनेबद्दल कळवाल.

c) लगेच मोटार सायकल चालकाला दवाखान्यात न्याल

d) पोलिसांना कळवून ते येण्याची वाट बघाल.

23. परीक्षा सूरू झाल्यावर तुमच्या असे लक्षात आले की, परीक्षेत विचारलेले प्रश्न खूपच अवघड आहेत आणि तुम्हाला त्याची उत्तरे लिहिता येणार नाहीत. तुम्ही -

a) पर्यवेक्षकाला सांगाल की प्रश्न अभ्यासक्रमाच्या बाहेरचे आहेत.

b) तुम्हाला जेवढी उत्तरे लिहिणे शक्य आहे, तेवढी शांत डोक्याने लिहाल.

c) कॉपी कराल

d) वरीलपैकी नाही

24. तुमच्या मित्राकडून तुमची एक बॅग हरवली. ज्यात तुमची महत्वाची कागदपत्रे आहेत. काय कराल ?

a) तुम्हाला राग येईल पण तुम्ही काही बोलणार नाही, कारण चुका सर्वांकडून होऊ शकतात.

b) राग येऊन तुम्ही त्याला कागदपत्रे परत द्यायला सांगाल.

c) परिस्थिती समजून घ्याल आणि त्याला सांगाल की ठीक आहे, काळजी करू नको.

d) त्याच्याशी बोलणे बंद कराल.

25. रेल्वेतून प्रवास करताना तुमच्या शेजारच्या डब्यातला माणूस बाहेर पडला. काय कराल ?

a) साखळी ओढून गाडी थांबवाल, जेणेकरून त्या माणसाला मदत करता येईल.

b) ट्रेनमधुन उडी माराल.

c) गाडी स्टेशनवर थांबल्यावर अधिकाऱ्यांना सांगाल.

d) काहीच करणार नाही.

26. तुमच्या कामाच्या ठिकाणी नवीन वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती झाली आहे. काय कराल?

a) तुम्हाला फरक पडणार नाही.

b) आपुलकीने स्वागत कराल.

c) त्यांचे कौतुक कराल, कारण त्यांच्या हाताखाली तुम्हाला भविष्यात काम करायचे आहे.

d) काहीच नाही.

27. तुमच्या मित्राच्या पार्टीत तुम्हाला असे लक्षात आले की, एका व्यक्तीच्या कपड्यांना टेबलावरच्या मेणबत्तीमुळे आग लागत आहे. काय कराल ?

a) तिला मागे वळून बघायला सांगाल.

b) तिचे नाव घेऊन ओरडाल, म्हणजे सर्व सावधान होतील.

c) जोरात पळून तिची ओढणी काढून, ती खाली फेकाल व त्यावर पटकन पाणी टाकाल.

d) ओढणी काढून लांब फेकाल

28. तुमचा कनिष्ठ अधिकारी तुमचे आदेश पाळत नाही आणि कारण नसताना तुम्ही सांगितलेली कामे करायला उशीर होतो. अशा परिस्थितीत आधी तुम्ही काय कराल ?

a) त्यांच्याविरूद्ध काही कारवाई का केली जाऊ नये याबद्दल त्याला कारणे दाखवा नोटीस पाठवाल.

b) निलंबनाची कारवाई सूरू कराल.

c) त्याला तुमच्या ऑफिसमध्ये बोलावून, त्याला 'काम केले नाही तर कारवाई होईल' अशी ठामपणे ताकीद द्याल.

d) त्याला तुमच्या ऑफिसमध्ये बोलावून, असे वागण्याबद्दलच्या कारणांची चर्चा करून त्याचे समुपदेशन कराल.

29. तुम्ही रेल्वे स्टेशनवर तुमच्या मित्राबरोबर आहात आणि अचानक एका मोठ्या स्फोटाचा आवाज ऐकू येतो आणि लोक इकडेतिकडे पळतात. अशावेळी तुम्ही काय कराल ?

a) लपण्यासाठी लगेच जागा शोधाल

b) लगेच तुमच्या मित्राबरोबर थांबून काही वाईट न होण्याची प्रार्थना कराल.

c) आवाज कुठून आला याचा शोध घ्याल

d) लगेच पोलीसांना कळवाल.

30. तुम्ही धार्मिकदृष्ट्या संवेदनशील जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आहात. दोन्ही समुदायांचे नेते प्रक्षोभक भाषणे करत आहेत. त्यामुळे येथे तणावग्रस्त परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत तुम्ही काय कारवाई कराल ?

a) लगेच दोन्ही नेत्यांच्या अटकेचे आदेश द्याल

b) दोन्ही नेत्यांना एकत्र ऑफिसमध्ये बोलावून त्यांच्यामध्ये शांतता करार घडवून आणाल.

c) दोन्ही नेत्यांना वेगवेगळे बोलावून त्यांना कडक शब्दांत बजावाल.

d) याबद्दल तुमच्या वरिष्ठांना कळवाल आणि त्यांच्या आदेशाची वाट बघाल.

31. एका दुकानदाराने तुमच्या वडिलांना खराब झालेल्या वस्तु विकल्या, त्याबद्दल तुमच्या वडिलांनी तुम्हाला त्याला मारायला सांगितले. तुम्ही काय कराल ?
a) तुमच्या वडिलांनी सांगितले तसे कराल.
b) तुमच्या वडिलांना कायदा हातात न घेण्याचा सल्ला द्याल. त्या दुकानदाराकडे खराब मालाबद्दल तक्रार करून त्याला वस्तु बदलून द्यायला सांगाल.
c) काही मित्रांना बरोबर घेऊन सांगितलेल्या कामावर जाल.
d) तुमच्या वडिलांना पोलीसात तक्रार करायला मदत कराल.

32. एक नागरिक या नात्याने तुमचे एका सरकारी कार्यालयात काम आहे. तिथला अधिकारी तुम्हाला सारखा बोलावत आहे आणि लाच देण्याचे अप्रत्यक्षपणे संकेत देत आहे. तुम्हाला तुमचे काम झालेले हवे आहे. तुम्ही काय कराल ?
a) लाच द्याल.
b) तुम्हाला त्याचे संकेत कळलेच नाही असे वागून परत तुमच्या कामासाठी मागे लागाल.
c) वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करून त्यांची मदत मागाल.
d) एक लेखी औपचारिक तक्रार कराल.

33. वेळेत पूर्ण करायच्या एका उपक्रमावर तुम्ही काम करत आहात. त्या उपक्रमासंबंधित बैठकीमध्ये तुमच्या असे लक्षात येते की, तुमच्या टीममधल्या सहकाऱ्यांच्या एकमेकांतील असहकार्यामुळे उपक्रमाला उशीर होऊ शकतो. काय कराल ?
a) सर्व सहकाऱ्यांना त्यांच्या या वृत्तीबद्दल ताकीद द्याल.
b) असहकाराबद्दल कारणांमध्ये लक्ष घालाल.
c) सहकारी बदलून देण्याची मागणी कराल.
d) योग्य ती कारणे देऊन वेळ वाढवून मागाल.

34. तुम्ही एका जिल्ह्यात अधिकारी आहात. तुमच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या जिल्ह्यातील शाळांमधील विद्यार्थी गळतीचे प्रमाण प्रचंड आहे, तर तुम्ही सर्वप्रथम कोणता निर्णय द्याल आणि संवाद साधाल ?
a) शैक्षणिक खात्याशी पत्रव्यवहार करून परिस्थितीमध्ये लक्ष घालण्यास सांगाल?
b) संबंधित शाळांचा परवाना रद्द कराल.
c) मोठ्या प्रमाणात निधी मिळण्यासाठी राज्य सरकारला पत्र लिहाल.
d) विद्यार्थी गळतीची कारणे जाणून शाळा आणि विद्यार्थांच्या पालकांशी संवाद साधाल.

35. पोलीस अधिकारी म्हणून काम करताना तुमच्या कार्यक्षेत्रातील एकट्या राहणाऱ्या वृद्ध लोकांवर हल्ले होण्याचे/चोऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. या वृद्ध लोकांची मुले प्रामुख्याने परदेशात स्थायिक झालेली आहेत. काय कराल ?
a) गुन्हा घडल्यानंतर त्यावर तपास करून पोलीस अधिकाऱ्याची भूमिका बजावणे.
b) एकट्या राहणाऱ्या वृद्धांची यादी तयार करून पोलीस चौकीत ठेवणे, त्यांना दिवसाआड फोन करणे.
c) सोसायट्यांमध्ये वृद्धांना मदत करण्यासाठी व कायदेशीर मदत मिळवण्यासाठी जागृती करणे.
d) काहीच करणार नाही.

36. जिल्हाधिकारी म्हणून तुम्हाला नवीन प्रकल्प राबविण्यासाठी शेतकऱ्यांची जमीन ताब्यात घ्यायची आहे. शेतकऱ्यांचा जमीन हस्तांतरणास विरोध आहे. तर तुम्ही कोणत्या प्रकारे संवाद साधाल ?
a) शेतकऱ्यांना जमिनीचा दर्जा व त्यातून मिळणारा मोबदला व नवीन प्रकल्पातून मिळणारा मोबदला याची माहिती पटवून देणे.
b) ज्या शेतकऱ्यांचा विरोध आहे त्यांच्यावर कायदेशीर कारवाईचे आदेश देणे.
c) शेतकऱ्यांना जमिनीसाठी बाजारभावापेक्षा जास्त किंमत देण्याचे आश्वासन देणे.
d) प्रकल्प दुसऱ्या ठिकाणी हलविणे व याची जाणीव शेतकऱ्यांना करून देणे.

37. नक्षलग्रस्त भागात तुमची बदली झाली आहे. काम करताना तुमच्या लक्षात आले की अनेक तरुणांना चुकीच्या पद्धतीने मार्गदर्शन करून नक्षलवादी कारवायांमध्ये सामावून घेतले जात आहे. काय कराल ?
a) राज्य सरकारकडून जास्त निधीची मागणी कराल व त्यातून सुविधांचा विकास कराल.
b) नक्षलवादावर स्वतंत्र अहवाल तयार करून राज्य सरकारला पाठवाल व त्यावर ठोस उपाययोजना करण्याची मागणी कराल.
c) तुमच्या कामातून सरकारला नक्षल भागातील लोकांची काळजी आहे हे दाखविणे व तरुणांना वाईट कृत्य करण्यापासून परावृत्त कराल.
d) नक्षलवाद्यांशी मैत्री करून त्यांना बदलण्यास भाग पाडाल.

38. एका युवतीवर रस्त्यात हल्ला होतो. ती जीव वाचवण्याच्या हेतूने जवळच असलेल्या पोलीस चौकीत धाव घेते. हल्ला झालेले ठिकाण तुमच्या पोलीस चौकीच्या कार्यक्षेत्रात येत नाही. तर पोलीस अधिकारी या नात्याने तुम्ही काय कराल ?
a) हल्ला झालेले ठिकाण ज्या चौकीच्या कार्यक्षेत्रात येते तेते त्या युवतीस जाण्यास सांगाल.
b) त्या युवतीस समोर बसवून त्या कार्यक्षेत्रातील पोलीस चौकीत संपर्क साधाल.
c) त्याक्षणी त्या युवतीस आवश्यक असणारी सुरक्षितता पुरवाल आणि गुन्हा नोंदवून घ्याल. त्यानंतर तो गुन्हा ठराविक पोलीस चौकीत पाठवाल.
d) त्या युवतीस घेऊन हॉस्पिटलमध्ये जाणे व नंतर गुन्हा नोंदवून घ्याल.

39. क्रीडा अधिकारी या नात्याने काम पाहताना तुम्हाला जाणवले की, इतर राज्यांच्या तुलनेत तुमच्या राज्याच्या खेळातील दर्जा घसरत आहे. तुमचे राज्य इतर राज्यांच्या तुलनेत आकारमानाने व लोकसंख्येने मोठे आहे. तर तुम्ही खेळाडूंना कसे प्रोत्साहित कराल ?
a) विजय मिळवणाऱ्या खेळाडूंना मोठ्या रकमेची पारितोषिके जाहीर कराल.
b) खेळाडूंना उत्कृष्ट पद्धतीने मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याची हमी देणे.
c) तुमच्या राज्याचा खेळातील दर्जा चांगल्या असतानाची उदाहरणे देऊन खेळाडूंच्या अडचणींमध्ये मदत करण्यास पाठिंबा दर्शविणे.
d) जे खेळाडु उत्तम कामगिरी करणार नाहीत त्यांच्या मानधनात कपात करणे.

40. एका गावात प्राथमिक आरोग्य केंद्र बरेच दूर आहे. तसेच आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचण्यासाठी वाहतुकीच्या सोयी उपलब्ध नाहीत. त्यामुळे लोक गावातील खासगी दवाखान्यात जाऊन उपचार घेतात. याचा रूग्णांवर आर्थिक ताण पडतो. तर आरोग्य अधिकारी म्हणून तुम्ही काय कराल ?

a) प्राथमिक आरोग्य केंद्र गावात मोक्याच्या ठिकाणी स्थलांतरित कराल.

b) खासगी डॉक्टरला कमी फी आकारण्यास सांगाल.

c) खासगी दवाखान्यात जायचे की प्राथमिक आरोग्य केंद्रात हा निर्णय तुम्ही रूग्णांवर सोडाल.

d) प्राथमिक आरोग्य केंद्रात पोहोचण्यासाठी तात्काळ वाहतुकीची व्यवस्था उपलब्ध कराल.

41. एका ठराविक कामासाठी वरिष्ठांनी तुमचा समावेश असलेला एक संघ निवडला आहे. तुम्ही काम करत असताना तुम्हाला जाणवले की संघप्रमुख तुम्हाला चुकीच्या पद्धतीने सांगत आहे. काय कराल ?

a) सहकाऱ्यांमध्ये चर्चा करून संघप्रमुखाला काहीच माहिती नाही हे सांगाला.

b) तुमच्या वरिष्ठांजवळ तक्रार करून संघप्रमुख बदलायला सांगाल.

c) संघ प्रमुखाला तुमचे म्हणणे स्पष्ट व योग्य रीतीने सांगून तुम्ही करत असलेले काम चुकीच्या मार्गाने जात आहे याची जाणीव करून द्याल.

d) काम पूर्ण झाल्यावर संघ प्रमुखाला व सहकाऱ्यांना बरोबर पद्धत काय होती याची जाणीव करून द्याल व परत ते काम योग्य रीतीने करण्यास सुरूवात कराल

42. शहरात बॉम्बस्फोटाची शक्यता असल्यामुळे तुम्ही पोलीस बंदोबस्त वाढवून ठिकठिकाणी नाकाबंदी केली आहे. सर्व प्रकारच्या चेकिंगमुळे सर्वसामान्य जनतेस त्रास सहन करावा लागत आहे. तर वरिष्ठ अधिकारी म्हणून तुम्ही काय कराल ?

a) नाकाबंदीचे प्रमाण कमी करून फक्त काहीच रस्त्यांवर नाकाबंदी सुरू ठेवाल.

b) तुम्ही नाकाबंदी जनतेच्या संरक्षणासाठी केली आहे त्यामुळे त्यांच्या त्रासाकडे दुर्लक्ष कराल.

c) नाकाबंदी काढून टाकाल, कारण दहशतवादी त्यांना हव्या असलेल्या ठिकाणी कोणत्याही प्रकारे पोहोचतीलच.

d) सामान्य जनतेस पोलीस करत असलेल्या नाकाबंदीची नीट माहिती द्याल व जलद गतीने चेकिंग करण्यासाठी पोलीसांची संख्या वाढवाल.

43. तुम्ही एक पोलीस अधिकारी आहात. पहारा एका मनोरंजन पार्कमध्ये आहे. तेथे तुम्हाला अनेक गोष्टींचा सामना करावा लागतो. ज्यात तुम्ही महत्त्वाचे निर्णय घ्यायचे आहेत. तुम्ही प्रथम काय सांभाळाल ?

a) स्टॉलवर झालेली चोरी.

b) गोंधळ झाला आहे आणि लोक इकडेतिकडे पळत आहेत.

c) पाळणा बंद झाला आहे व लोक त्यात फसले आहेत.

d) एक बेवडा रस्त्याच्या बाजूला पडला आहे.

44. तुमच्या विभागात, तुम्ही सोडून सगळ्यांची पगारवाढ झाली. तुम्ही -

a) मानाल की चूक झाली आहे आणि वरिष्ठांशी बोलाल.

b) वरिष्ठांसोबत बोलाल.

c) वरिष्ठांच्या तुमच्या सहकाऱ्यांकडे खोड्या कराल.

d) नोकरी सोडून द्याल.

45. एका जिल्ह्यात खूप पावसामुळे पिकाची नासाडी झाली आहे. काय कराल ?

a) अनुदान द्याल.

b) मोफत बिजे आणि खाद्य द्याल.

c) कर्जे माफ कराल.

d) खाद्याचा पुरवठा कराल.

46. तुमच्या सुपर बॉसच्या मुलाने तुम्हाला रेल्वे तिकीट आणायला सांगितले. काय कराल ?

a) तुमच्या कनिष्ठाला व्यवस्था करायला सांगाल.

b) सुपरबॉसला याची माहिती द्याल.

c) स्वतःच्या खर्चाने तिकिटाची व्यवस्था कराल.

d) विभागाच्या खर्चावर तिकिटाची व्यवस्था कराल.

47. देशाच्या पश्चिम भागात धुक्यामुळे हवाई व रेल्वे सेवा बंद आहेत. अशा परिस्थितीत तुमची सर्वांत उत्तम प्रतिक्रिया कोणती ?

a) या क्षेत्रात हवाई व रेल्वे सेवा बंदच ठेवल्या पाहिजेत.

b) लोकांना सल्ला दिला पाहिजे की, त्यांनी आपल्या यात्रेची योजना संभावित धोक्याची जाणीव ठेवून बनवावी.

c) धुके हटवण्याचा प्रयत्न.

d) लोकांनी स्वतःची सोय पहावी कारण सरकार कधीच काही करत नाही.

48. तुम्ही मंत्रालयात उपसचिव म्हणून काम बघता. सहाय्यक पदासाठी नियुक्ती करणे हे तुमचे काम. दोन जागांसाठी 10 उमेदवारांपैकी शैक्षणिक गुणवत्ता आणि पूर्वानुभव यांच्या आधारावर नियुक्त्या सांगतात. वरिष्ठ तुम्हाला उमेदवार 'क्ष' चे नाव सुचवायला सांगतात. काय कराल ?

a) आपल्या वरिष्ठांना सांगाल आणि त्याप्रमाणे काम कराल.

b) संबंध टिकवून ठेवण्यासाठी, मागणी मान्य कराल.

c) सर्व 10 उमेदवारांचा नीट अभ्यास करून नावे सुचवाल. मग त्यात 'क्ष' असू शकतो.

d) उमेदवार 'क्ष' चे नाव सुचवणार नाही.

SECTION - B (गुण : 24)

या विभागात एकूण 24 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला एक गुण याप्रमाणे हा विभाग 24 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुणपद्धत लागू नाही.

1. प्रभावी संवादाची कोणतीही दोन तत्त्वे सांगा.
2. संवादातील तीन अडथळे सांगा.
3. संवादातील दिशा कोणत्या ?
4. 'डाऊनवर्ड कम्युनिकेशन' म्हणजे काय ?
5. अभाषिक संवाद कशावरून कळतो ?
6. इमोशनल इन्टेलिजन्स म्हणजे काय ? (थोडक्यात)
7. निर्णय घेण्याचे प्रकार सांगा.
8. SUV चे फायदे सांगा
9. PMI पद्धत म्हणजे काय ?
10. समस्या कशा प्रकारे सोडवतात ?
11. योग्य कृती म्हणजे काय ?
12. एखादी कृती निवडताना कशाचा विचार करावा ?
13. निर्णय घेणारे कोण असतात ?
14. निर्णय घेण्याच्या पद्धती कोणत्या ?
15. निर्णय घेण्याच्या चार शैली कोणत्या ?
16. टी चार्ट पद्धत काय आहे ?
17. आकडेवारी पद्धत काय आहे ?
18. Assertiveness Communication म्हणजे काय ?
19. आंतरवैयक्तिक समस्या मित्रांमध्ये होऊ शकते का ?
20. Emmotional Intellegence चे फायदे काय ?
21. राग व्यवस्थापन न केल्यास काय परिणाम होऊ शकतात ?
22. Grapevine म्हणजे काय ?
23. इलेक्ट्रॉनिक कम्युनिकेशन कोणते ?
24. इलेक्ट्रॉनिक कम्युनिकेशनचे फायदे काय ?

SECTION - C (गुण : 32)

हा विभाग दीर्घोत्तरी स्वरूपाचा आहेच. या विभागाला 32 गुण आहेत. या विभागाला उणे गुण पद्धत लागू नाही. कोणतेही चार सोडवा.

1. सकारात्मक आंतरवैयक्तिक वातावरण तयार करण्यासाठी काय करावे ?

2. कम्युनिकेशनची प्रक्रिया सांगा.

3. Non-verbal Communication म्हणजे काय ?

4. Lateral Communication चे उदाहरण स्पष्ट करा.

5. प्रभावी संवादाची कोणतेही तत्त्व स्पष्ट करा.

